| Article Date | Headline / Summary | Publication |
| --- | --- | --- |
| 23 Nov 2025 | Cold weather and car insurance | Prabhat |



# थंड हवामान व कार विमा

**शंका :** थंड हवामानामुळे माझी कार बॅटरी निकामी झाल्यास रोडसाईड असिस्टन्समध्ये टोईंग कव्हर मिळेल?

**उत्तर :** हिवाळ्यातील आल्हाददायक सकाळ कधीकधी त्रासदायक ठरू शकते. विशेषतः जेव्हा कार सुरू होत नाही. थंडगार हिवाळ्यात बॅटरी डेड होणे ही अगदी सर्वसाधारण गोष्ट आहे. मात्र, तुमच्या रोडसाईड असिस्टन्स प्लॅन अशा वेळी मदतीला येऊ शकेल का? हे आधीच जाणून घेणे शहाणपणाचे पाऊल असेल. बहुतांश रोडसाईड असिस्टन्स सर्व्हिस बॅटरी संबंधित ब्रेकडाऊनसाठी तत्काळ मदत देतात. मात्र, टोईंगसह कव्हरेज किती हे पूर्णपणे तुमच्या प्लॅनवर अवलंबून असते.

साधारणपणे, रोडसाईड असिस्टन्स टीम पहिल्यांदा वाहन जम्प-स्टार्ट करण्याचा प्रयत्न करते. बॅटरीची स्थिती पूर्ववत होण्यापलीकडील असल्यास पुढचा पर्याय म्हणजे टोईंग. तथापि, टोईंग नेहमीच अमर्यादित नसते. अनेक प्लॅनमध्ये १० ते २५ किलोमीटरपर्यंतच मोफत टोईंग दिले जाते, तर काही कंपन्या १०० किलोमीटरपर्यंत कव्हरेज देतात. तुमचे पसंतीचे गॅरेज या मर्यादेपेक्षा दूर असल्यास अतिरिक्त खर्च स्वतःला करावा लागू शकतो. काही प्रोव्हायडर केवळ नजीकच्या अधिकृत सर्व्हिस सेंटरपर्यंतच टोईंग सुविधा पुरवितात. त्यामुळे हे सर्व तपशील वेळेपूर्वीच जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

थंड हवामानामुळे बॅटरी निकामी झाल्यास ती सामान्यपणे कव्हर केली जाते. परंतु बॅटरी जुनी असल्यास किंवा व्यवस्थित मेंटेन केलेली नसल्यास काही प्रोव्हायडर त्याला आपत्कालीन स्थिती मानत नाहीत किंवा कव्हरेज नाकारू शकतात. तरीसुद्धा, बहुतेक कंपन्या रोडसाईड सहाय्य देताना कारण शोधण्यात वेळ घालवत नाहीत. त्यांचा उद्देश केवळ एकच असतो. तुमचा प्रवास शक्य तितक्या लवकर पुन्हा सुरू व्हावा. तुमचे रोडसाईड असिस्टन्स तुमच्या कार इन्श्युरन्समध्ये समाविष्ट असल्यास किंवा तुमच्या कार मॅन्युफॅक्चररकडून दिले गेले असल्यास, तर त्यातील वेळ किंवा अंतराच्या मर्यादा तपासून पाहा. मॅन्युफॅक्चरर प्लॅन्स काही वर्षांनंतर संपतात आणि इन्शुरन्स प्लॅन्समध्ये रोडसाईड कव्हरेज वेगळे ॲड-ऑन म्हणून घ्यावे लागते. तुमच्या मोटर पॉलिसीसोबत रोडसाईड असिस्टन्स खरेदी करणे नेहमीच योग्य आहे. कारण त्यामुळे तुम्हाला अपघाताच्या ठिकाणापासून कायदेशीर सल्ला, आपत्कालीन निवास, टॅक्सी व्यवस्था आणि विश्वसनीय गॅरेजपर्यंत मदत अशी संपूर्ण सुविधा मिळते. रोडसाईड असिस्टन्समध्ये सहसा थंड हवामानात बॅटरी डेड झाल्यास मदत मिळते. ज्यामध्ये आवश्यक असल्यास टोईंगची सुविधाही दिली जाते. मात्र, नेमकी सर्व्हिस आणि तिच्या मर्यादा तुमच्या प्लॅननुसार बदलतात. काही पॉलिसीमध्ये फक्त ठराविक अंतरापर्यंत किंवा निवडक गॅरेजपर्यंतच टोईंग कव्हर असते. मदतीची वेळ येण्यापूर्वीच तुमच्या कव्हरेजच्या तपशिलांची खात्री करून घेणे महत्त्वाचे आहे. तुमच्या प्लॅनमध्ये काय समाविष्ट आहे हे आधीच माहीत असणे उपयुक्त ठरू शकते.

**– राकेश कौल**
चीफ डिस्ट्रीब्यूशन ऑफिसर - रिटेल बिझनेस, बजाज जनरल इन्श्युरन्स